पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले जयंती

**कोल्हापूर :** महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. दिनकर मोरे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. प्रभंजन माने आदी उपस्थित होते.

12 APR 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधान, लोकशाही, ज्ञानातून जगणे सुंदर व्हावे

## विद्यापीठातील परिसंवादात सूर; डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे आयोजन

कोल्हापूर, ता. ११ : संविधानिक मूल्ये, लोकशाही शिक्षण, ज्ञान या त्रिसूत्रीच्या आधारे माणसाचे जगणे सुंदर बनविण्याचे ध्येय बाळगणे म्हणजेच महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारताची संकल्पना साकारणे होय, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात आज उमटला.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे सोमवार (ता. १०) फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ झाला. महात्मा फुले जयंतीनिमित्त सप्ताहात 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांची भारतविषयक संकल्पना' विषयावर परिसंवाद झाला. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात सप्ताहाचे आयोजन केले आहे.

शारदाबाई पवार अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील म्हणाल्या, "भारताच्या संकल्पनेत राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचे समाजवादी, धर्मनिरपेक्ष मार्गाने प्रस्थापन अभिप्रेत होते. त्या दिशेने आपण ५० वर्षे प्रवास केला. जागतिकीकरणाच्या कालखंडात धर्म, वर्गाचे मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरण होऊन सामाजिक-आर्थिक दरी वाढते आहे. ती वाढू न देण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर, नेहरू, गांधी यांची भारताची संकल्पना समजून घेणे आणि सातत्याने मांडत राहणे फार महत्त्वाचे आहे."



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'फुले, आंबेडकरांची भारतविषयक संकल्पना' परिसंवादात बोलताना डॉ. भारती पाटील.**

> आधुनिकता ही काळावर नव्हे, तर विचार व कार्य प्रक्रियेवर अवलंबून असते. बुद्ध, महावीर यांचे विचारकार्य अडीच हजार वर्षांनंतरही आधुनिक व प्रस्तुत असते. आपण मात्र दिखावटी आधुनिकतेच्या प्रेमात असतो. त्यामुळे प्रगल्भ नागरिक घडल्याखेरीज फुले-आंबेडकरांच्या भारताची संकल्पना प्रत्यक्षात येणार नाही.
>
> **- डॉ. श्रीकृष्ण महाजन,**
> संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र

डॉ. अरुण शिंदे म्हणाले, "भारत बळीस्थान अर्थात शेतकऱ्यांचा देश आहे, अशी फुले यांनी मांडणी केली. स्त्री, शूद्रातिशूद्रांच्या लोककल्याणकारी राज्याची कल्पना त्यांनी केली होती. त्यांच्या उत्थानाच्या दिशेने त्यांनी आपले जीवितकार्य केंद्रित केले होते. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून उपयोगाचे नसून सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त समाजरचना असणारा भारत फुले यांना अभिप्रेत होता."

टेकचंद सोनवणे म्हणाले, "समाजाच्या अस्पृश्य, वंचित घटकांच्या नैसर्गिक हक्कांवर बंधने आणणाऱ्या व्यवस्थांशी झगडा मांडणाऱ्या बाबासाहेबांनी सामाजिक-आर्थिक समानता प्रस्थापनेचे ध्येय बाळगले होते. त्यांच्या राष्ट्रसंकल्पनेत प्रेम, ममत्व, वात्सल्य आणि करुणा या माध्यमातून माणूसपण विकसित करण्यास जसे महत्त्व होते, तसे सांविधानिक मूल्ये व लोकशाही शिक्षणालाही प्रचंड महत्त्व आहे. मात्र, नेमके त्या बाबतीत आपण अद्याप मोठा पल्ला गाठावयाचा आहे." या वेळी डॉ. दीपा श्रावस्ती यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी परिचय करून दिला. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

12 APR 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोष्टी स्वरूपात उलगडणार शाहू महाराजांचा इतिहास

## शिवाजी विद्यापीठाचा प्रकल्प; मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व कन्नड भाषांत पुस्तक होणार प्रकाशित



राजर्षी छत्रपती शाहू महाराज.

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा इतिहास गोष्टीनुरूप स्वरूपात पाच भाषांत प्रकाशित होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे त्याचे लेखन करीत आहेत. 'असे होते आपले शाहू महाराज' या शीर्षकाखाली पुस्तक आकाराला येत असून, सुमारे १०० पानांच्या पुस्तकातून शाहू महाराजांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व उलगडले जाईल. शाहू राजांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाने हा प्रकल्प हाती घेतला आहे. येत्या जूनमध्ये पुस्तकाचे प्रकाशन होईल.

> राजर्षी शाहू महाराज साध्या प्रसंगांतून समजून घेणे रोमांचक ठरेल. ते प्रत्येक कृतीतून प्रबोधन करीत होते. शिवाय, माणसांची पारख करीत होते. ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. तरीही सामान्य माणूस म्हणून जगत होते. त्यांच्या आयुष्यातील घटना समजून घेतल्या, तर त्यांची समाज परिवर्तनाची तळमळ दिसून येईल.
>
> **- डॉ. नंदकुमार मोरे**, मराठी अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ



शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची सूत्रे १८९४ मध्ये हाती घेतल्यावर संस्थानात आमूलाग्र बदल घडविला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राला ऊर्जितावस्था दिली. छोट्या-छोट्या गोष्टींतून त्यांनी समाज परिवर्तनाचा विचार मांडला. सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून त्यांचा लौकिक देशभर पसरला. कुर्मी समाजाने 'राजर्षी' पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी त्यांच्या कार्याची ओळख समाजाला करून दिली. संशोधनातून राजांच्या दूरदृष्टीच्या कामाचे महत्त्व अधोरेखित केले. शाहू विचार समजून घेण्यासाठी युवा पिढीची धडपड आजही सुरू असून, हा विचार समाजात रुजविण्यासाठी व्याख्यात्यांची एक फळी तयार होत आहे.

राजर्षी शाहू स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाने शाहू कृतज्ञता पर्वातून शाहू राजांच्या इतिहासाला उजाळा दिला. आता राजांचा इतिहास गोष्टी स्वरूपात बालमनावर कोरला जावा, यासाठी विद्यापीठाने पाऊल उचलले. शालेय विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. त्यासाठी राजांच्या आयुष्यातील घटना, प्रसंगांवर प्रकाशझोत टाकला. डॉ. मोरे यांनी शाहू चरित्राचा अभ्यास केला असून, त्यांच्या लेखणीतून गोष्टीनुरूप इतिहास आकार घेत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व कन्नड भाषांत हे पुस्तक प्रकाशित केले जाईल.



सकाळ

# विद्यापीठातर्फे कायदेविषयक मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विधी अधिविभाग आणि किल्ले रायगड ग्रुपतर्फे ग्रुप ग्रामपंचायत रायगडवाडी वाघेरी येथे मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर झाले. त्यात विधी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी तेथील ग्रामीण जनजीवन व त्यांच्या कायदेविषयक अडचणी समजून घेतल्या. अध्यक्षस्थानी विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे होते. ॲड. सत्यशीला दळवी यांनी महिलांविषयक कायदे, बाल लैंगिक अत्याचार व बचत गट यावर मार्गदर्शन केले. ॲड. देवदास चौगले यांनी धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त जमीन पुनर्वसन नियम व मिळणारे फायदे यासंदर्भात मार्गदर्शन केले. ॲड. प्रियांका गुरव आणि विद्यार्थ्यांच्या टीमने व्यसनमुक्तीपर तसेच 'हम सब एक है' ही दोन पथनाट्य ग्रामस्थांसमोर सादर केली. डॉ. धुपदाळे व टीमने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केल्याबद्दल ग्रामस्थ, सरपंचांनी त्यांचा सत्कार केला.

जनसंपर्क कक्ष
12 APR 2023
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी

# विद्यापीठाकडून ४०२ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांतर्गत ४०२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ लॉ स्पेशल व पाच वर्षे अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे झाल्या. दरम्यान, दि ११ रोजी एम.जे., बी.जे., बी.कॉम., एम.ए., एम.एस्सी., बी.सी.ए. आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षेत भरारी पथकाकडून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत ४ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे झाली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

12 APR 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# झाडांच्या वेदना!

भोवताल



डॉ. व्ही.एन. शिंदे

बहुतांश भारतीय रूढी, प्रथा, परंपरा, सण साजरे करण्यामागे शास्त्रीय विचार आढळतो. मात्र, त्याची मांडणी वैज्ञानिक सत्यावर आधारित झालेली नाही. ती धार्मिक किंवा देवावर आधारित आहे. त्यामुळे अनेक लोक अंधश्रद्धा म्हणून त्याकडे दुर्लक्ष करतात; तर कालौघात आलेले बदल स्वीकारत अनेकजण त्या अंधपणे साजऱ्या करतात. वटसावित्री पौर्णिमेच्या मागील लेखात यावर थोडे भाष्य केले आहे. तरीही पुन्हा या विषयावर लिहिण्याचे कारण म्हणजे नुकतेच इस्त्रायल आणि अमेरिकेतील संशोधकांचे वनस्पती संदर्भातील संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

भारतीय रूढी, प्रथा, परंपरा आणि सण साजरे करताना वनस्पतींचा वापर किंवा संबंध येतो. हे संशोधनही वनस्पतींच्या संदर्भात आहे. वनस्पती तणावात असताना आवाज करतात. हे आवाज अल्ट्रासोनिक तरंगाच्या रूपात असतात. त्यामुळे मानवी कानांना त्यांची संवेदना जाणवत नाही. त्यामुळे या तरंगांना शोधणारी उपकरणे वापरून, पंधरा संशोधकांच्या गटाने केलेले संशोधन 'सेल' या जगप्रसिद्ध संशोधनपत्रिकेच्या ९ मार्च २०२३ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. भारतीय संशोधक जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींना भावना असतात हे सर्वप्रथम मांडले. सुरुवातीला रॉयल सोसायटीने त्यांचे हे संशोधन प्रसिद्ध करण्यास नकार दिला. ज्यावेळी हे लेखन त्यांनी पुस्तकरूपात प्रसिद्ध केले आणि ते लोकप्रिय ठरू लागले, तेव्हा रॉयल सोसायटीने ते मागवून घेतले आणि प्रसिद्ध केले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या संशोधनाने जगदीशचंद्र बोस यांच्या निष्कर्षाची आठवण आली. पुढे संगीत ऐकवल्यास पिकांची वाढ चांगली होते, हे शोधण्यात आले.

तणावाखाली असणारी झाडे सुखात असणाऱ्या झाडांपेक्षा वेगळा आवाज काढतात, हे या संशोधनाचे सार आहे. लिलाच हॅडनी यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन झाले आहे. पाणी अपुरे मिळणे हे झाड तणावाखाली येण्याचे प्रमुख कारण आहे. पाणी कमी मिळाले की झाडाचा रंग बदलतो. त्याचा गंध आणि आकारही बदलतो. मात्र, झाडांचा आवाज बदलतो हे या संशोधनातून प्रथमच सिद्ध करण्यात आले आहे. या संशोधनासाठी टोमॅटो आणि तंबाखूची रोपे निवडण्यात आली होती. ही झाडे आवाजविरहीत अशा ग्रीनरूममध्ये वाढवण्यात आली. त्यांच्या वाढीच्या सर्व नोंदी नियमित घेण्यात आल्या. त्यानंतर काही रोपांना पूर्वीप्रमाणेच सर्व सुविधा म्हणजे पाणी आणि खते देण्यात आली. मात्र, काही रोपांना यापासून वंचित ठेवण्यात आले. त्यावेळी ज्या रोपांना खते आणि पाणी पुरेशा प्रमाणात देण्यात आले नाही, त्या झाडांच्या रंग, आकार आणि गंधामध्ये बदल जाणवला. यातील गंध बदलतो, कारण तणावाखाली असणारी वनस्पती उर्ध्वपतन होईल, असे सेंद्रिय रसायन बाहेर टाकते. त्याच्या संवेदना शेजारी असणाऱ्या झाडांपर्यंत पोहोचतात आणि त्या अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सावध करतात. तणावामध्ये असणाऱ्या वनस्पतींमध्ये दृश्य, रासायनिक आणि स्पर्शज्ञानाने समजतील असे बदल होतात. उदाहरणार्थ काही वनस्पतींपासून पाणी कमी मिळाल्यास उग्र दर्प येतो. पानांचा रंग बदलतो. तसेच काही वनस्पतींची पाने ताठ दिसत असली, तरी त्यांना स्पर्श केल्यास मऊपणा आल्याचे लक्षात येते. या त्यांच्यातील बदलांचे आकलन त्यांच्याभोवती असणाऱ्या समस्त जीवसृष्टीला होते. मात्र, त्यांच्या वेदना ज्या आवाजात बाहेर पडतात, त्याबाबत आजवर संशोधन झालेले नव्हते.

हा आवाज वनस्पतींच्या खोडातील पाणी वाहून नेणाऱ्या भागातून बाहेर पडतो. त्या ठिकाणी पाणी कमी मिळाल्यामुळे हवेचे बुडबुडे तयार होतात. त्यामुळे तो भाग फुगतो आणि त्यापासून हा आवाज येत असल्याचे हे संशोधन सांगते. हा आवाज ध्वनिबंद ग्रीनहाऊस इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सहाय्याने नोंदण्यात आला. या वनस्पतींचा आवाज त्यांना खाणाऱ्या प्राण्यांना आणि झाडाच्या सहनिवासी जीवांना मात्र ऐकायला येतो. झाडे तणावाखाली आल्यानंतर त्यांच्या फुलांमध्ये पुष्परसांचे प्रमाण वाढते. वनस्पतींचा हा आवाज काही मीटर दूरवर ऐकायला येतो. तसेच वनस्पतींना जगण्यासाठी आवश्यक घटकांची कमतरता झाल्यास आवाज येतो. झाड तोडतानाही असा आवाज येतो. तसेच वेगवेगळ्या तणावाखाली येणारे आवाजही वेगळे असतात. या संशोधनामध्ये मिळालेल्या निष्कर्षाचा फायदा पिकांची चांगली वाढ करण्यासाठी होऊ शकेल, असे या संशोधकांनी नमूद केले आहे. या संशोधनातही मानवाने आपल्या स्वार्थाचाच विचार केला आहे. पिकांची वाढ चांगली करणे आणि त्यापासून उत्पादन वाढवणे हा संशोधनातील फायदा दिसतो. तरीही या संशोधनाने वनस्पतींना भावना असतात आणि त्या तणावाखाली वेगळे आवाज काढतात, हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. तरीही, एकूण जीवसृष्टीसाठी वनस्पतींचे योगदान आणि त्यांचे संवर्धन करणे, जतन करण्यासंदर्भात कोणताही विचार मांडण्यात आलेला नाही. खरे तर पृथ्वीवर जीवसृष्टी टिकवून ठेवावयाची असेल तर जल, जंगल आणि जमीन यांचे संतुलन राखणे आवश्यक आहे. या तीन घटकांतील कोणत्याही एका घटकाचे प्रमाण घटले तर संपूर्ण जीवसृष्टी नष्ट होईल. जमीन चांगली असेल, तर तेथे पाणी टिकेल आणि वनस्पती चांगल्या वाढतील. वनस्पती चांगल्या वाढल्या, तर त्या जमिनीची धूप थांबवतील आणि जमिनीत पाणीही टिकवून ठेवतील. जमिनीत पाणी असेल तर वनस्पती चांगल्या वाढतील. पर्यावरण योग्य राहील. पाऊस पाडणे आपल्या हातात नाही. जमिनीचा पोत बदलणे ठराविक मर्यादेपर्यंतच शक्य आहे. त्यामुळे या क्षेत्रात फार मोठे बदल करता येणे शक्य नाही. विविध प्रकारच्या मातीमध्ये, जमिनीमध्ये वाढणाऱ्या झाडांच्या जाती आहेत. योग्य जागी योग्य वाणांची झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे आपल्या हाती आहे. मागील काही वर्षांत झाडांचे महत्त्व लोकांच्या लक्षात आल्यामुळे अनेक लोक मोठ्या उत्साहाने झाडे लावतात. मात्र, लावल्यानंतर ती वाढतात किंवा नाही याबाबत चिंता करत नाहीत. झाडे मात्र त्यांच्या सहजीवींना आपबिती सांगतात. सावध करतात. झाडे चल नाहीत. त्यांना आपल्यासाठी योग्य वातावरण शोधता येत नाही. ते स्वतःची जागा सोडून योग्य ठिकाणी जाऊ शकत नाही. ही सवलत प्राण्यांना मिळते. प्राण्यांना जगण्यासाठी वातावरण योग्य नाही असे वाटले की ते आपली जागा सोडून योग्य जागी जाऊन राहतात.

झाडे मानव लावतो, मात्र त्यांची काळजी बहुतांश वेळा घेतली जात नाही. त्यामुळे लावलेली अनेक झाडे मरतात. मोठी झाडे अमानुषपणे कापतात. मानवाला रस्ते मोठे हवेत. कारखाने उभारायचे असतात. शेतीसाठी जमीन हवी असते. इमारती बांधायच्या असतात. अन्न शिजवण्यासाठी जळण हवे असते. त्यासाठी झाडे तोडली जातात, मात्र भविष्यात यासाठी झाडे असायला हवीत. झाडे लावताना त्यांना जगवण्याचा विचार प्रथम व्हायला हवा. तोडताना झाडांनाही भावना आहेत, हे लक्षात घ्यायला हवे!

संपर्क : ९६७३७८४४००